जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६९६ दिनांक - १६/०९/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

# कात्रज भागात मिक्सर व ट्रकच्या महागडया बॅटऱ्या चोरी करुन धुमाकुळ घालणाऱ्या भामटयास केले जेरबंद

दि. ०१/०९/२०२३ रोजी व दिनांक ०२/०९/२०२३ रोजीचे सकाळी फिर्यादी यांचे संतोषनगर लेन नंबर ७, डिलाईट बेकरीच्या शेजारी विजय लक्ष्मी मोटर्स या गॅरेजच्या कपांऊन्डमधुन ट्रक क्रमांक मधील दोन बॅटऱ्या कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केल्या त्याबाबत भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि.न ५७६/२०२३, भादंवि कलम ३८० अन्वये गुन्हा दाखल आहे.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हद्दीत मिक्सर, ट्रक व बस मधील बॅटऱ्या चोरींचे प्रमाण वाढल्या मुळे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार हे वर नमुद गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार **चेतन गोरे, अभिनय चौधरी** यांना सदरचा गुन्हा **तुषार संजय धनावडे, वय २७ वर्षे, रा. मुळ भिलारेवाडी, ग्रामपंचायत ऑफिस समोर, ता.हवेली, जि.पुणे सध्या रा.फ्लॅट नंबर १६, ४ था मजला,शारदा निकेतन सोसायटी, बेनकर वस्ती, धायरी, पुणे** या इसमाने केला असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील अधिकारी व अंमलदार यांनी सदर आरोपीताचा शोध घेतला असता तो भिलारेवाडी, चामुंडा माता मंदीराचे समोरील रोडवर मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करता त्याने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५७६/२०२३, भादंवि कलम ३८० या गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक केली आहे.

आरोपी तुषार संजय धनावडे याचेकडे अटके दरम्यान तपास केला असता त्याने मागील दोन वर्षापासुन कात्रज, भिलारेवाडी, मांगडेवाडी भागातील मिक्सर, ट्रक, बसच्या बॅटऱ्या रात्रीच्या वेळी चोरी केल्याची कबुली दिली असुन त्याचेकडुन एकुण १,७५,०००/- रुपयांचा १३ महागडया बॅटऱ्या जप्त करण्यात आल्या असुन आरोपीता कडुन भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील एकूण ८ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे, श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, गिरीश दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव गायकवाड, अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार चेतन गोरे, अभिनय चौधरी, सचिन सरपाले, महेश बारावकर, निलेश ढमढेरे, शैलेश साठे, मंगेश पवार, अवधतु जमदाडे, अभिजीत जाधव, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, हर्षल शिंदे, निलेश खैरमोडे, आशिष गायकवाड, अभिनय चौधरी, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.